डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकरी गट प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

## मातीला जिवंत ठेवण्यासाठी नैसर्गिक शेती गरजेची : डॉ. चिंतामणी देवकर

---

महात्मा फुले कृषि विद्यापीठ सलग्न कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत दि. १६ ते १७ जानेवारी असे दोन दिवसीय निवासी शेतकरी, महिला आणि ग्रामीण युवकांसाठी शेतकरी गट प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. सदर प्रशिक्षण उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. चिंतामणी देवकर, सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, धुळे यांनी भूषविले. डॉ. घनश्याम काबरे, विभाग प्रमुख, कृषि कीटक शास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, धुळे,. श्री. हितेंद्र सोनवणे, प्रकल्प उप संचालक, आत्मा, धुळे, डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, कृषिभूषण श्री. दिलीप पाटील, डॉ. धनराज चौधरी इत्यादी मान्यवर प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित होते. डॉ. अतिश पाटील, मृदा शास्त्रज्ञ, यांनी प्रशिक्षण समन्वयक म्हणून दोन दिवसीय कार्यक्रमाचे नियोजन केले.

डॉ. दिनेश नांद्रे (कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, धुळे) यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणामद्धे रासायनिक, सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती यांची वैशिष्टे सर्वांसमोर मांडली. तसेच अलीकडे उदयास येत असलेल्या विषमुक्त शेती संकल्पनेची माहिती सांगितली. नैसर्गिक शेतीमधील मुलभूत घटक, संकल्पना, महत्व आणि व्यवस्थापन, तसेच नैसर्गिक शेतमालाचे विक्री व्यवस्थापन बद्दल सविस्तर माहिती दिली.

श्री. हितेंद्र सोनवणे (प्रकल्प उप संचालक, आत्मा, धुळे) यांनी कृषि विभागाच्या माध्यमातून नैसर्गिक शेती संबंधित केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकरी गटांची नोंदणी, शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना, जैविक निविष्ठा संसाधन केंद्रांची स्थापना करून नैसर्गिक शेतीचा विस्तार वाढवण्यासाठी सर्वांनी सामुहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.

डॉ. चिंतामणी देवकर (सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, धुळे) यांनी अध्यक्षणीय भाषणात मातीला जिवंत ठेवण्यासाठी आपल्याला पुन्हा नैसर्गिक शेतीकडे वळणे कसे गरजेचे आहे यावर विचार व्यक्त केले. माती हा शेतीचा एक अविभाज्य असा भाग असून, बियाण्याचा पेरणी पासून पिकाचा काढणीपर्यंत शेतातील मातीच सर्व पोषण करत असते. परंतु आता पाण्याचा, रसायनांच्या अतिरेकी वापरामुळे मातीतील जैविक गुणधर्म नाहीसे होत आहेत. ते टिकवण्यासाठी आपल्याला जास्तीत ज्यास्त सेंद्रिय घटकांचा वापर करावा लागेल असे ते म्हणाले.

सदर प्रशिक्षणामध्ये नैसर्गिक शेतीचे गरज, मुलभूत घटक, व्यवस्थापन; नैसर्गिक पद्धतीने प्रमुख पिकांचे उत्पादन तंत्रज्ञान; भाजीपाला आणि फळपिके उत्पादन तंत्रज्ञान; अन्नद्रव्य व्यवस्थापन, जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे व्यवस्थापन, पशु संवर्धनाचे महत्त्व, जैविक पद्धतीने कीड व रोग व्यवस्थापन, शेतीमाल विक्री साखळी व निर्यात, प्रमानिकरण पध्दती इ. महत्वाच्या विषयांवर मार्गदर्शन झाले.

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकरी गट प्रशिक्षण कार्यक्रम डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. अतिश पाटील, डॉ. विक्रांत भालेराव, डॉ. धनराज चौधरी, श्री. रोहित कडू, श्री. विनय बोरसे, कृषिभूषण श्री. दिलीप पाटील यांचे त्रांत्रिक मार्गदर्शन लाभले.

प्रगतशील शेतकरी कृषिभूषण श्री. दिलीप पाटील यांनी नैसर्गिक शेतीमधील त्यांचे अनुभव सांगितले. नैसर्गिक शेतीमध्ये अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी घनामृत, बिजामृत, जीवामृत, गांडूळखत निर्मिती उत्पादन तंत्रज्ञान; तसेच किड- रोग नियंत्रणासाठी नीमास्त्र, दशपर्णी अर्क, अग्निअस्त्र, ब्रमास्त्र बनवण्याचे कृती प्रात्यक्षिक कृषिभूषण श्री. दिलीप पाटील आणि मृदा शास्त्रज्ञ डॉ. अतिश पाटील यांनी उपस्थितांना दाखवीले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी श्री. कुर्बान तडवी (जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे) यांनी निसर्गातून उपलब्ध झालेल्या किंवा शेताच्या बांधावर कमीत कमी खर्चात तयार केलेल्या सेंद्रिय पदार्थांचाच वापर करणे गरजेचे आहे असे नमूद केले. कृषि रसायने, रासायनिक खतांचा अश्यास्त्रीय वापर, एकच पिक पद्धती आणि सेंद्रिय खतांचा अभाव यामुळे जमिनीचे आरोग्य बिघडत चालले आहे.

जमिनीची प्रत सुधारण्यासाठी सेंद्रिय निविष्टांचा ज्यास्त वापर करणे अत्यंत गरजेचे आहे असे ते म्हणाले. श्री. नवनाथ कोळपकर, प्रकल्प संचालक, आत्मा, धुळे हे देखील समारोप कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अतिश पाटील यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. धनराज चौधरी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यामध्ये डॉ. पंकज पाटील, श्री. जगदीश कथेपुरी, श्रीमती अमृता राऊत, श्री जयराम गावीत, श्रीमती प्राची काळे, स्वप्नील महाजन, बाळू वाघ, रमेश शिंदे, कुमार भोये इ. यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदर प्रशिक्षणाला धुळे आणि साक्री तालुक्यातील कृषी विभागातील अधिकारी तसेच नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकरी गटांचे एकूण ९५ प्रशिक्षणार्थी सहभागी होते.



नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन कारताना डॉ. चिंतामणी देवकर, सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, धुळे



नैसर्गिक निविष्ठा बनवण्याचे कृती प्रात्यक्षिक दाखवताना कृषिभूषण श्री. दिलीप पाटील आणि डॉ. अतिश पाटील